## प्रकरण पाचवे

# उपसंहार

## प्रकरण - पाचवे

## उपसंहार

आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी हा ललित वाङ्मय प्रकार म्हणून ओळखला जातो. जीवनाच्या सुख दुःखाबरोबरच मानवी जीवनाचा विशालपट उभा करण्याचे सामर्थ्य या वाङ्मय प्रकारात आहे. तिची वेगवेगळया अंगानी रूपे जन्मास आली आहेत. पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय अशा विविध रुपातून अनेक अनुभव व्यक्त होताना दिसतात. त्यामुळे अन्य वाङ्मयप्रकारापेक्षा हा वाङ्मय प्रकार लोकप्रिय ठरतो. या वाङ्मय प्रकाराचे वेगवेगळे प्रवाह अस्तित्वात आले आहेत. त्यातीलच एक प्रवाह म्हणजे ' महानगरीय कादंबरी ' होय. या प्रकारातून महानगराचे वास्तव जीवन चित्रित झाले आहे. यात अनेक लेखकांनी लेखन केलेले दिसते. त्यातीलच एक महत्त्वाचे लेखक म्हणजे सुमेध वडावाला हे होय. त्यांच्या कादंब-यातून महानगरीय जीवनाचे वास्तव चित्रण आले आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात " सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचा अभ्यास " या शीर्षकांतर्गत एकूण चार प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत ' उपसंहार ' या प्रकरणामध्ये आतापर्यंतच्या विवेचनातून हाती आलेले निष्कर्ष मांडावयाचे आहेत.

" कादंबरी : एक वाङ्मय प्रकार आणि सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांचे कथात्मक लेखन " या पहिल्या प्रकरणामध्ये कादंबरीचे स्वरूप, उद्दिष्ट ; तिच्या व्याख्या, घटक आणि तिच्या विविध विषयांमुळे निर्माण झालेली अनेक रूपे आपण अभ्यासली. हे अभ्यासत असताना आपण तिचा इतर वाङ्मय प्रकारांशीदेखील तुलनात्मक विचार केला. ' कादंबरी ' हा प्रकार पाश्चात्त्य वाङ्मयाच्या इतिहासात १८ व्या तर मराठी वाङ्मयाच्या इतिहासात १९ व्या शतकात उदयास आलेला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कादंबरीला इंग्रजीत ' नॉव्हेल ' असे संबोधण्यात येते. तर याच शब्दावरुन ' नावल ' हा शब्द मराठीत अस्तित्वात आला. याचा विचार आपण केला. परंतु संस्कृत कवी बाणभट्टाने लिहिलेल्या कथेतील नायिकेच्या ' कादंबरी ' या नावावरूनच मराठीत ' कादंबरी ' हा शब्द रूढ झाला असावा असे देखील आपण अभ्यासले आहे. तिच्या विविध व्याख्येविषयी विचार केला. त्यात अनेक अभ्यासकांनी तिची समर्पक व्याख्या देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात भालचंद्र नेमाडे यांची व्याख्या अधिक समर्पक वाटते. कादंबरीविषयी अभ्यास करत असताना आपण तिच्या विविध घटकांचा विचार केला. कथानक व्यक्तिचित्रण, वातावरणाची निर्मिती, भाषाशैली, संवाद इत्यादी घटकांचा आपण विस्ताराने विचार केला. तिच्या अनेक विषयांमुळे पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, प्रादेशिक, ग्रामीण, मनोविश्लेषणात्मक, संज्ञाप्रवाही अशी रूपे तयार झाली आहेत. याचा देखील आपण विस्ताराने अभ्यास केला.

त्याचबरोबर या प्रकरणात आपण कादंबरीचा इतर वाङ्मय प्रकाराशी तुलनात्मक दृष्टीने अभ्यास केला. यात नाटक, कथा आणि कविता या वाङ्मयप्रकारापेक्षा हा वाडमयप्रकार कसा श्रेष्ठ आहे, याचा विचार या ठिकाणी केला आहे. तसेच या प्रकरणाच्या पुढील भागात आपण सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कथात्मक लेखनाचा विचार केला.

त्यात आपण त्यांच्या एकूण सहा कथासंग्रहांचा आणि चार कादंबर-यांचा अभ्यास केला. सांजवा-१९९३, अंत गोकुळाचा-१९९९, सामक्षा-२००४, चित्रं-२००४ आणि ताटी उघडा-२००५ हे कथासंग्रह तर धर्मयुध्द-१९९२, ब्रह्मकमळ-१९९७, तृष्णा-२००० आणि संदर्भासहित स्पष्टीकरण-२००६ या चार कादंब-यांचा समावेश होतो. या कथात्मक लेखनाच्या अभ्यासावरून आपण असे पाहिले की, त्यांचे लेखन हे महानगरीय जीवनाशी निगडित आहे. त्यांच्या लिखाणातून स्त्रीच्या विविध भाव-भावनांचे, अंतर्मनाचे दर्शन घडते. तसेच महानगरातील संस्कृती प्रवृत्ती आणि विकृती इत्यादींचे दर्शन घडते.

एकूणच रिसबूडांचे लेखन महानगरातील मध्यमवर्गीय जीवन, चाळसंस्कृती, दारिद्रय, श्रीमंत लोकांचे जीवन, तेथील लोकांची जीवन जगण्यातील धडपड इत्यादी विविध प्रकारच्या

आशयांद्वारे व्यक्त झाले आहे. तसेच त्यांच्या लेखनातून ग्रामीण जीवनाचे चित्रणही आले आहे. या प्रकरणात आपण ' तृष्णा ' या कादंबरीच्या अभ्यासात अतिशय गंभीर विषयांवरील चित्रणाचा विचार केला. लेखकाने या कादंबरीतून ' समलैंगिक ' विषयावर चिंतनशीलतेने प्रकाश टाकला आहे. या कादंबरीत ' समलैंगिक ' लोकांच्या मानसिकतेच्या अंतर्मनाचा शोध लेखकाने घेतला आहे.

"' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीची आशयसूत्रे " या दुसऱ्या प्रकरणामध्ये सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांच्या कादंबरीची आशयसूत्रे अभ्यासली. प्रस्तुत कादंबरीत सुमेध वडावाला ( रिसबूड ) यांनी मुख्य आशयसूत्रांबरोबर इतरही आशयसूत्रांची मांडणी केली आहे, त्याचा विचार केला. ही कादंबरी महानगरीय जीवनावर प्रकाश टाकते. त्यामुळे कादंबरीतून आलेली आशयसूत्रे ही प्रामुख्याने महानगरीय जीवन, संस्कृती, तेथील सामाजिक , आर्थिक जीवन इत्यादीचे दर्शन घडवते. त्याआधी आपण ' महानगरीय कादंबरी ' ही संकल्पना समजून घेतली. कारण प्रस्तुत कादंबरी ही महानगरीय कादंबरीत मोडते. म्हणून ' महानगरीय कादंबरी ' म्हणून त्याचा विचार केला.

ही कादंबरी एका व्यसनी तरुणाची शोकात्म कथा आहे. हा तरुण या कादंबरीचा नायक आहे. दारूमुळे त्याच्या जीवनाची संपूर्णतः वाताहत झाल्याचे आपणास दिसते. तसेच या नायकाबरोबरच त्याची आई, बायको, मुलगा, सावत्रभाऊ, त्याची बायको आणि वडील इत्यादी मिळून त्यांचे मध्यमवर्गीय कुटुंब या कादंबरीतून चित्रित झाले आहे. नरसू हा बेडेकर शॉपमध्ये कामाला लागल्यावर तिथे पैसे चोरतो आणि या चोरीला नायकाची आई ( माई ) प्रोत्साहन करते, नायकाचे मित्र आणि कुटुंबाव्यतिरिक्त इतरही अनेक व्यक्तिरेखांचा विचार केला.

तसेच या कादंबरीतून येणारा महानगरातील भ्रष्टाचार, गुन्हेगारी व्यवसाय, तेथील दारिद्रयमय जीवन आपण अभ्यासले. या गुन्हेगारी जगताचे दर्शन लेखकाने अत्यंत वास्तवपूर्ण पध्दतीने दर्शविले आहे. त्यामुळे मटका व्यवसाय, दारूचा व्यवसाय, चोरी इत्यादी गुन्हेगारी क्षेत्र या ठिकाणी चित्रित झाले आहे. तसेच पोलीस, आरोग्य, शिक्षण, वीज आणि महानगरपालिका

इत्यादी सर्व प्रशासकीय विभागात चालणाऱ्या भ्रष्टाचाराचे काम करणाऱ्या सामाजिक व धार्मिक संस्थांचा आपण विचार केला. त्यात ' अल्कोहोलिक ॲनॉनिमस ' ही धार्मिक तर ' बेटर लाईफ फॉर दि नार्कोटिक्स ' या सामाजिक संस्थेचे महत्त्वाचे कार्य करताना दिसून आले.

या प्रकरणामध्ये एका बाजूला श्रीमंत तर दुसऱ्या बाजूला वाढत जाणारे दारिद्रयमय जीवन कसे आहे. याचा प्रत्यय या कादंबरीतून येतो. या दारिद्रयामुळे तिथल्या लोकांना करावे लागणारे विविध व्यवसाय, मग त्यात शरीरविक्रय असेल अथवा गुन्हेगारी या गलिच्छ जीवनाचे चित्रण या कादंबरीतून येते.

तिस-या प्रकारणामध्ये "' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतील व्यक्तिरेखा " अभ्यासल्या. कादंबरीतील जवळपास सर्वच व्यक्तिरेखा या महानगरीय जीवनाशी बांधल्या गेल्या आहेत. यात काही मध्यमवर्गीय तर काही गुन्हेगारी जगतातील व्यक्तिरेखा येतात. या व्यक्तिरेखांच्या आधारे लेखकाने एक वास्तवपूर्ण कथानक साकारले आहे. या कथानकाला पुढे नेण्याचे काम या व्यक्तिरेखांनी केले आहे. या व्यक्तिरेखा आपण मुख्य, दुय्यम आणि इतर अशा तीन टप्प्यात विभागणी करुन अभ्यासल्या आहेत. नायकाच्या कुटुंबातील व्यक्तिरेखांव्यतिरिक्त इतरही व्यक्तिरेखा या कादंबरीतून येतात.

या प्रकरणात प्रमुख व्यक्तिरेखांमध्ये कादंबरीचा नायक नृसिंह ( नरसू ) याचा विचार केला. त्याची व्यसनाधीनता, बुध्दिमत्ता, त्याचे कविमन इत्यादी वैशिष्टये आहेत. त्याच्या जीवनाची वाताहत ही वाचकांच्या मनाचा ठाव घेते. तसेच नायकाची आई ( माई ) ही स्वार्थी स्वभावाची आहे. ती स्वत:चा मुलगा आणि सावत्र मुलगा असा भेद मानते. आपल्या मुलाचे भले व्हावे, त्याने खूप पैसा कमवावा म्हणून ती सतत धडपडते. त्यासाठी त्याला चोरी करण्यास प्रोत्साहन देते. याचा विचारदेखील या ठिकाणी आपण केला.

नरसूचा सावत्रभाऊ राघव हा सरकारी नोकरीत होता. तो नृसिंहाकडे सतत लक्ष देतो. त्याच्या आरोग्याची, खण्यापिण्याची काळजी घेतो. मात्र नायकाची बायको व्यसनाला कंटाळून

माहेरी निघून जाते. व सोबत सुकुमारला ( मुलाला ) देखील घेऊन जाते. ती नवऱ्याचे दारूचे व्यसन सुटावे यासाठी प्रयत्न करते. नायकाच्या कुटुंबाव्यतिरिक्त येणाऱ्या व्यक्तिरेखांमध्ये तुरुंगातील विलक्षण तरुण, मटकाकिंग, आपटेबाई, अश्विनशेट, चिंतन चहावाला इत्यादी व्यक्तिरेखांचा आपण विचार केला. तुरुंगातील विलक्षण तरुण हा बापाचा मटक्याचा व्यवसाय चालवितो. त्यामुळे त्याला वेळोवेळी तुरुंगात जावे लागते. तो कविमनाचा आहे. त्यामुळे त्याला या व्यवसायात अजिबात आवड नसते. परंतु त्याच्या बापाचा त्याला आग्रह असतो. त्याचा बाप या व्यवसायात ' किंग ' आहे. अश्विनशेट हे सराफीचा व्यवसाय करतात. नरसूला वेळोवेळी मदत करतात. तर आपटेबाई या नरसूच्या शाळेतील आवडत्या शिक्षिका असतात. फरेराबाई हीदेखील गुन्हेगारी जगतातील एक व्यक्तिरेखा या ठिकाणी येते. दारूचा गुत्ता चालवून ती आपले जीवन जगते याचे वास्तव चित्रण कादंबरीत येते.

या व्यक्तिरेखांशिवाय इतरही व्यक्तिरेखा या कादंबरीतून येतात. त्याचादेखील आपण या प्रकरणातून संक्षिप्त रूपाने विचार केला. त्यात नरसूची बायको, विलक्षण तरुणाची बायको, त्याची आई, बच्चूभाय यासर्व वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखा या कादंबरीतून वाचकांना भेटतात.

"' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष " या चौथ्या प्रकरणामध्ये आपण कादंबरीचे वाङ्मयीन विशेष अभ्यासले. सुमेध वडावाल यांची ही कादंबरी वाङ्मयीन दृष्टीने वैशिष्टयपूर्ण आहे. प्रामुख्याने या प्रकरणात वातावरणाची निर्मिती, निवेदन पध्दती आणि भाषाशैली इत्यादी घटकांच्या आधारे या कादंबरीचे मूल्यमापन केले आहे.

सुरुवातीला आपण कादंबरीच्या कथानकात मुख्य कथानकाच्या मांडणीचा आशयाच्या दृष्टीने विचार केला. यात नायकाच्या व्यसनी जीवनाचा व त्यामुळे होणाऱ्या वाताहतीचा आपण प्रामुख्याने अभ्यास केला. नशा केल्यामुळे नाशाकडे जाणारे आयुष्य नायकाला जगावे लागते अशा प्रकारच्या कथानकाची मांडणी केली आहे. यानंतर आपण या कादंबरीत आलेल्या व्यक्तिरेखांचा विचार केला. त्यात मुख्य, गौण आणि इतर अशा तीन टप्प्यातून व्यक्तिरेखाटनाचा संक्षिप्त विचार केला. या कादंबरीचा वाङ्मयीन दृष्टीने विचार करताना आपण तिच्यातील वातावरणाच्या

निर्मितीविषयी विचार केला. त्यात लेखकाने महानगरातील झोपडपट्टी, तुरुंगातील दुर्गंधी अस्वच्छ वातावरण आणि पावसाचे आलेले ठिकठिकाणचे वर्णन यातून मानवी जीवनाचे वास्तव दर्शन घडते असे म्हणता येईल.

निवेदनाच्या बाबतीत विचार करतांना आपण कादंबरीत आलेल्या निवेदनाचा अभ्यास केला. या कादंबरीत ' प्रथमपुरुषी ' निवेदन पध्दती लेखकाने वापरली आहे. आणि जणू काही नायकच आपल्या आयुष्याची जीवन कहाणी आपल्यासमोर मांडतो आहे अशा प्रकारची निवेदन पध्दती वापरून लेखकाने कथानक साकारले आहे. हे विशेष मानावे लागते, या निवेदनासाठी वापरावी लागणारी भाषा व तिच्या शैलीचा देखील आपण या प्रकरणातून विचार केला आहे. यात भाषेच्या विविध वैशिष्टयांच्या आधारे आपण या कादंबरीचा अभ्यास केला. ही वैशिष्टये म्हणजे संवाद, काव्यात्मकता, म्हणी, वाक्प्रचारांचा वापर, इतर भाषेचा वापर आणि योग्य संवादाची कौशल्यापूर्ण रचना करून लेखकाने कथानक समजण्यास योग्य मदत केली आहे. तसेच आशयाला अनुसरून काव्यनिर्मिती करुन अथवा कवीच्या काव्याचा वापर करून एक विशिष्ट लय प्राप्त करून दिली आहे. तसेच वेगवेगळया आशयाच्या म्हणी, वाक्प्रचारांचा व शिव्यांचा वापर करून भाषेला वेगळेपण प्राप्त करुन दिले आहे असे म्हणता येईल. याशिवाय इंग्रजी व हिंदी भाषेचा अधिक ठिकाणी वापर करून तिचे वेगळेपण सिध्द केले आहे. व महानगरातील बोलीचादेखील वापर या कादंबरीत लेखकाने केला आहे. यामुळे कादंबरीचे वाङ्मयीन विशेष हे तिच्या एकूणच रचनेवरून अभ्यासण्यास आपणास योग्य दिशा मिळाली आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या ' उपसंहार ' या पाचव्या प्रकरणामध्ये पहिल्या प्रकरणापासून ते चौथ्या प्रकरणापर्यंतचा स्थूल आढावा घेतला आहे. व या अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष थोडक्यात पुढील प्रमाणे मांडता येतील.

**निष्कर्ष** :-

१. कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की, कादंबरी हा समाजदर्शनात्मक, बोधात्मक, तात्विक बैठक असलेला एक वाङ्मय प्रकार आहे.

२. प्रत्येक साहित्यकृती ही स्वतंत्र असल्यामुळे प्रत्येक साहित्यकृतीतून व्यक्त होणारा आशय हा वेगवेगळया स्वरूपातून येतो.

३. कादंबरी हा वाङ्मयप्रकार विविध विषयांना आपल्यात सामावून घेणारा आहे असे आपल्या लक्षात येते.

४. कादंबरीतील या विविध विषयांमुळे तिची एकच - एक अशी व्याख्या करता येत नाही, असे ही आपण पाहिले.

५. कादंबरी हा वाङ्मयप्रकार अनेक घटकांनी मिळून बनलेला आहे तसेच तिची विविध रूपेही उदयाला आली आहेत.

६. कादंबरी हा वाङ्मयप्रकार इतर वाङ्मय प्रकारापेक्षा स्वतंत्र आणि लोकप्रिय आहे.

७. सुमेध वडावाला ( रिसबूड ) हे महानगरीय कादंबरीकार आहेत. त्यांनी या कादंबरीतून महानगरीय जीवनाचे वास्तव चित्रण साकारले आहे.

८. ' देह जावो अथवा जावो ' ही कादंबरी एका मध्यमवर्गीय कुटुंबाचे तसेच चाळसंस्कृतीचे दर्शन घडविते.

९. सुमेध वडावाला रिसबूड यांच्या ' देह जावो अथवा जावो ' या कादंबरीतून एका महानगरीय मध्यवर्गीय कुटुंबातील तरुणाच्या व्यसनामुळे झालेल्या वाताहतीचे दर्शन घडते. या तरुणाला आपले संपूर्ण आयुष्य घराबाहेर काढावे लागते.

१०. या कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा आल्या आहेत. त्या सर्व व्यक्तिरेखा आपले वेगवेगळे गुण वैशिष्ट्य दर्शवितात. या प्रत्येक व्यक्तिरेखेचा नायकाशी संबंध येतो. म्हणून या ठिकाणी नातेसंबंधांचे चित्रण अत्यंत लोभसपणे आले आहे.

११. महानगरातील विविध क्षेत्रात चालणारा भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी जगत याचे चित्रण या कादंबरीतून येते.

१२. त्याचप्रमाणे आपण या ठिकाणी महानगरीय चाळसंस्कृती, झोपडपट्टीतील दारिद्र्यमय जीवनाचा अभ्यास केला. यातून महानगरीय जीवनाचे वास्तव आपल्या लक्षात येते.

१३. याच महानगरातील व्यसनी व बेवारस लोकांसाठी काम करणा-या अनेक सामाजिक संस्था असतात. त्यापैकी या कादंबरीत आलेल्या एका सामाजिक व धार्मिक संस्थांचा आपण अभ्यास केला. या संस्था व्यसनी लोकांचा सहारा बनतात. त्यांना व्यसनापासून दूर करण्याचा प्रयत्न करतात. हे देखील या ठिकाणी आपण अभ्यासले.

१४. सुमेध वडावाला यांनी या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष वाढावे. तिला एक विशिष्ट रुप प्राप्त व्हावे म्हणून निवेदनातून नायकाच्या ' आत्मकथेचे लिखाण ' स्वतः नायकच करतो आहे. अशा प्रकारचे कथानक साकारले आहे.

१५. तसेच प्रसंगानुरूप आशयाला धरुन लेखकाने संपूर्ण कादंबरीतून विविध म्हणी, वाक्प्रचार, काव्यात्मकता आणि शिव्यांचा वापर करून या कादंबरीला वेगळेपण प्राप्त करून दिले आहे. आणि कादंबरीचे वाङ्मयीन मूल्य वाढविले आहे असे म्हणता येईल.